महात्मा जोतीराव फुले यांच्या २०० व्या जयंतीनिमित्त सन २०२७ हे द्विजन्मशताब्दी वर्ष साजरे करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण-२०२६/प्र.क्र.३३/समन्वय
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ४ नोव्हेंबर, २०२६.

वाचा :- सामान्य प्रशासन विभाग यांचा शासन निर्णय क्रमांक: शताब्दी-२०२६/प्र.क्र.०९/समन्वय-२, दिनांक १० मार्च, २०२६.

प्रस्तावना :-

महात्मा जोतीराव फुले हे आधुनिक भारतातील सामाजिक क्रांतीचे अग्रदूत, थोर समाजसुधारक, शिक्षणतज्ञ व मानवी मूल्यांचे पुरस्कर्ते होते. त्यांनी १९ व्या शतकात जातीय विषमता, अंधश्रद्धा आणि शिक्षणावरील बंदी याविरोधात निर्भयपणे लढा दिला. सत्यशोधक समाजाची स्थापना करून त्यांनी समतेचा, सामाजिक न्यायाचा आणि मानवमुक्तीचा विचार सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवला.

स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणारे महात्मा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी शिक्षण हेच समाज परिवर्तनाचे प्रभावी माध्यम असल्याचे प्रत्यक्ष कृतीतून दाखवून दिले. वंचित, शोषित समाजासाठी शिक्षण, प्रतिष्ठा आणि समानतेसाठी त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला. त्यामुळेच महात्मा फुले यांचे विचार आजही संविधानिक मूल्ये, सामाजिक समता आणि समतेवर आधारित लोकशाहीसाठी अत्यंत मार्गदर्शक ठरतात.

महात्मा फुले यांच्या जयंतीला सन २०२७ मध्ये २०० वर्षे पूर्ण होत आहेत. या निमीत्ताने मा. मुख्यमंत्री महोदयांनी महात्मा जोतीराव फुले यांचे सन २०२७ हे द्विजन्मशताब्दी वर्ष साजरे करण्यासंदर्भात सन २०२६ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये घोषणा केलेली आहे. यानुसार सन २०२७ मध्ये महात्मा जोतीराव फुले यांचे द्विजन्मशताब्दी वर्ष साजरे करण्यासाठी राबवावयाच्या उपक्रमासाठी शासन निर्णय दि. १० मार्च, २०२६ अन्वये समिती गठीत करण्यात आली आहे.

महात्मा जोतीराव फुले यांनी भारतीय समाजात सामाजिक समता, स्त्री शिक्षण, शेतकरी कल्याण व सामाजिक न्याय या क्षेत्रांत केलेले कार्य अद्वितीय आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या अनुषंगाने विद्यार्थ्यांमध्ये मूल्याधिष्ठित, समावेशक व कौशल्याधारित शिक्षणाची जोपासना करण्यासाठी त्यांच्या विचारांचे संवर्धन करणे आवश्यक आहे. या अनुषंगाने महात्मा जोतीराव फुले यांच्या द्विजन्मशताब्दी निमित्त या विभागाच्या अधिनस्त संचालनालये/ सर्व विद्यापीठे/ महाविद्यालये/ संस्थांमध्ये विविध उपक्रम, कार्यक्रम साजरे करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन परिपत्रकः-

महात्मा जोतीराव फुले यांनी भारतीय समाजात सामाजिक समता, स्त्री शिक्षण, शेतकरी कल्याण व सामाजिक न्याय या क्षेत्रांत केलेले कार्य अद्वितीय आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या अनुषंगाने विद्यार्थ्यांमध्ये मूल्याधिष्ठित, समावेशक व कौशल्याधारित शिक्षणाची जोपासना करण्यासाठी त्यांच्या विचारांचे संवर्धन करणे आवश्यक आहे.

या अनुषंगाने महात्मा जोतीराव फुले यांच्या द्विजन्मशताब्दी निमित्त या विभागाच्या अधिपत्याखालील उच्च शिक्षण / तंत्र शिक्षण / कला/ ग्रंथालय संचालनालये व त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विद्यापीठे/ महाविद्यालये/ संस्था यांनी राबवायच्या विविध उपक्रमांचा कृती आराखडा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांनी राबवायच्या उपक्रमांचा कृती आराखडा

अ.क्र	महिना	उपक्रम	तपशिल	विद्यार्थ्यांमध्ये विकसित होणारी अपेक्षित मुल्ये
१	नोव्हेंबर, २०२६	स्त्री सक्षमीकरण	-स्त्री सक्षमीकरण विषयक भरीव काम करणाऱ्या व्यक्तींच्या मुलाखती. -भूमिका अभिनय (Role Play) : महात्मा फुले, सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर नाटिका -पोस्टर स्पर्धा, पुस्तक प्रदर्शन - महात्मा फुले शैक्षणिक प्रेरणा सप्ताह विशेष अभियान	लिंगसमभाव
२	डिसेंबर, २०२६	नेतृत्व व नागरिकत्व	- संविधानावर आधारित पुस्तकांचे वाचन, महात्मा फुले साहित्यवाचन अभियान, -परिसंवाद,चर्चासत्रे ,कार्यशाळा आयोजन -पोवाडा स्पर्धा - जनजागृती रॅली	नेतृत्व विकास व वाचन कौशल्य चितंन क्षमता
३	जानेवारी २०२७	सांस्कृतिक विकास	-महात्मा फुले यांच्या जीवनावर आधारित सांस्कृतिक महोत्सव, देशभक्तीपर कार्यक्रम - चित्रकला स्पर्धा - लोककला सादरीकरण	सांस्कृतिक जाणीव़
४	फेब्रुवारी २०२७	संशोधन व प्रकल्प	-प्रकल्प कार्य -स्थानिक इतिहास अभ्यास - मुलाखत उपक्रम - प्रदर्शन	संशोधन कौशल्य
५	मार्च २०२७	स्पर्धा	वादविवाद स्पर्धा, निबंध स्पर्धा, प्रश्नमंजूषा स्पर्धा प्रकल्प सादरीकरण पोस्टर निर्मिती उपक्रम	ज्ञान कौशल्य व स्व अभिव्यक्ती
६	एप्रील २०२७	समारोप	समारोप कार्यक्रम- पुरस्कार वितरण, सामाजिक कार्यकर्त्यांसाठी, विद्यार्थी व शिक्षकासांठी/प्राध्यापकांसाठी विशेष सन्मान योजना -अनुभव लेखन,अहवाल सादरीकरण	चिंतन , एकत्रीकरण

तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांनी राबवायच्या उपक्रमांचा कृती आराखडा

अ.क्र.	महिना	उपक्रम	तपशील	विद्यार्थ्यांमध्ये विकसित होणारी अपेक्षित मूल्ये व कौशल्ये
१	नोव्हेंबर २०२६	स्त्रीशिक्षण व महिला सक्षमीकरण	-स्त्रीसक्षमीकरणासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिला अभियंते, संशोधक व उद्योजिका यांच्या मुलाखती व व्याख्याने आयोजित करणे. -महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित भूमिका अभिनय, नाटिका व पोस्टर स्पर्धा आयोजित करणे. -महात्मा फुले शैक्षणिक प्रेरणा सप्ताह व पुस्तक प्रदर्शन आयोजित करणे.	लिंगसमभाव, आत्मविश्वास, नेतृत्वगुण व सामाजिक संवेदनशीलता.
२	डिसेंबर २०२६	सामाजिक समता, नेतृत्व व नागरिकत्व	-महात्मा फुले साहित्य व संविधान विषयक पुस्तकांचे वाचन अभियान, परिसंवाद, चर्चासत्रे, कार्यशाळा, डिजिटल साक्षरता अभियान, पोवाडा स्पर्धा व सामाजिक जनजागृती रॅली आयोजित करणे.	नेतृत्वविकास, वाचनकौशल्य, चिकित्सक विचारक्षमता, सामाजिक जबाबदारी व डिजिटल साक्षरता.
३	जानेवारी २०२७	सर्जनशीलता व वैचारिक अभिव्यक्ती	-महात्मा जोतीराव फुले यांच्या जीवनातील महत्त्वपूर्ण घटना, स्त्रीशिक्षण, सामाजिक सुधारणा व सामाजिक न्यायासाठी दिलेल्या योगदानावर आधारित लघुपट निर्मिती स्पर्धा (Short Film Competition) आयोजित करणे. - महात्मा फुले यांचे जीवनचरित्र, शैक्षणिक विचार, सामाजिक कार्य व आधुनिक समाजातील त्यांच्या विचारांची प्रासंगिकता या विषयांवर शोधनिबंध सादरीकरण स्पर्धा (Paper Presentation Competition) आयोजित करणे.	सर्जनशीलता, संशोधनवृत्ती, चिकित्सक विचारक्षमता, संवादकौशल्य, डिजिटल माध्यम कौशल्य, सांस्कृतिक जाणीव व सामाजिक मूल्यांची जोपासना.
४	फेब्रुवारी २०२७	संशोधन, नवोपक्रम व तंत्रज्ञान	-ग्रामीण व सामाजिक समस्यांवरील प्रकल्पकार्य, स्थानिक इतिहास अभ्यास, तांत्रिक मॉडेल निर्मिती, हॅकाथॉन, संशोधन सादरीकरण, नवोपक्रम प्रदर्शन व सामाजिक उपयुक्त तंत्रज्ञानावर आधारित प्रकल्प स्पर्धा आयोजित करणे.	संशोधनकौशल्य, नवोपक्रमशीलता, समस्या निराकरण क्षमता, तांत्रिक कौशल्य व सामाजिक उत्तरदायित्व.
५	मार्च २०२७	कौशल्यविकास, स्पर्धा व उद्योजकता	-वादविवाद स्पर्धा, निबंध स्पर्धा, प्रश्नमंजुषा स्पर्धा, प्रकल्प सादरीकरण, पोस्टर निर्मिती, स्टार्टअप संकल्पना स्पर्धा, कौशल्याधारित कार्यशाळा व उद्योजकता मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करणे.	ज्ञानवृद्धी, स्वअभिव्यक्ती, संवादकौशल्य, नेतृत्व, उद्योजकता व कौशल्यविकास.

६	एप्रिल, २०२७	द्विजन्मशताब्दी विशेष कार्यक्रम व समारोप	-महात्मा जोतीराव फुले जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रम आयोजित करणे. -लघुपट निर्मिती स्पर्धा, शोधनिबंध सादरीकरण स्पर्धा, संशोधन प्रकल्प व इतर स्पर्धांतील उत्कृष्ट विद्यार्थ्यांचा गौरव करणे. सामाजिक कार्यकर्ते, शिक्षक व प्राध्यापक यांच्यासाठी विशेष सन्मान कार्यक्रम आयोजित करणे. -अनुभवलेखन, उपक्रमांचे प्रदर्शन व एकत्रित अहवाल सादरीकरण करणे.	चिंतन, सामाजिक बांधिलकी, प्रेरणा, सामूहिक कार्यभावना व मूल्याधिष्ठित दृष्टिकोन.

कला संचालनालय, मुंबई यांनी राबवायच्या उपक्रमांचा कृती आराखडा

अ.क्र	महिना	उपक्रम	तपशिल	विद्यार्थ्यांमध्ये विकसित होणारी अपेक्षित मुल्ये
१	नोव्हेंबर, २०२६	स्त्री सक्षमीकरण व दृश्य कला	- क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व जोतीराव फुले यांच्या जीवनावरील प्रसंगांचे थेट रेखाटन (Live Sketching) - 'स्त्री सक्षमीकरण' संकल्पनेवर पोस्टर डिझायनिंग स्पर्धा.	लिंगसमभाव, सामाजिक संवेदनशीलता, थेट रेखाटन कौशल्य (Live Sketching), मानवी आकृतीचे रेखाटन ज्ञान (Anatomy Study) व सृजनशीलता.
२	डिसेंबर, २०२६	leadership, नागरिकत्व व लोककला	- भारतीय संविधान, लोकशाही आणि सामाजिक समतेवर आधारित कॅलिग्राफी (सुलेखन) प्रदर्शन.	नेतृत्व विकास, सुलेखन कौशल्य, नागरिकत्वाची जाणीव, चिंतन क्षमता.
३	जानेवारी, २०२७	सांस्कृतिक विकास व दृश्यात्मक महोत्सव	- 'महात्मा फुले जीवनपट' या विषयावर महाविद्यालय स्तरावर चित्र व शिल्पकला स्पर्धा.	सांस्कृतिक जाणीव, त्रिमितीय आकार ज्ञान (Spatial Awareness), ऐतिहासिक वारशाचा अभिमान.
४	फेब्रुवारी, २०२७	कला संशोधन व स्थानिक वारसा प्रकल्प	- परिसरातील जुन्या सत्यशोधक चळवळीच्या केंद्रांना भेटी देऊन ऐतिहासिक वास्तूंचे रेखाटन (Architectural Sketching).	संशोधन वृत्ती, वैज्ञानिक दृष्टिकोन, कौशल्य, चिकित्सक विचार.
५	मार्च, २०२७	कलेचे उपक्रम	- 'सामाजिक वास्तववाद' (Social Realism) या विषयावर आधारित कला उपक्रम.	स्व-अभिव्यक्ती, तार्किक विचार क्षमता, सादरीकरण कौशल्य (Presentation Skills), आत्मविश्वास.
६	एप्रिल, २०२७	द्विजन्मशताब्दी भव्य समारोप	- द्विजन्मशताब्दी वर्षाच्या वर्षभरातील सर्वोत्कृष्ट कलाकृतींचे महाविद्यालय स्तरावर प्रदर्शन (Art Exhibition).	कृतज्ञता भाव, मूल्य एकत्रीकरण, संघभावना, सामाजिक उत्तरदायित्व.

ग्रंथालय संचालनालय, मुंबई यांनी राबवायच्या उपक्रमांचा कृती आराखडा

अ.क्र	महिना	उपक्रम	तपशिल	विद्यार्थ्यांमध्ये विकसित होणारी अपेक्षित मुल्ये
१	नोव्हेंबर, २०२६	नेतृत्व व नागरिकत्व	महात्मा जोतिराव फुले यांच्या कार्याविषयी व्याख्याने आयोजित करणे.	नेतृत्व विकास
२	डिसेंबर, २०२६	सांस्कृतिक विकास	-महात्मा फुलेंचे विचार लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी विद्यार्थी/ कलाकारांमार्फत एकपात्री प्रयोग करणे -वेशभूषा करून रील्स तयार करणे -महात्मा फुले यांनी लिहिलेल्या नाटकांचे / पुस्तकांचे जाहीर वाचन करणे.	सांस्कृतिक जाणीव
३	जानेवारी, २०२७	ग्रंथप्रदर्शन	-ग्रंथालयामध्ये महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी लिहलेल्या व त्यांच्या कार्याविषयी लिहलेल्या ग्रंथांचे ग्रंथपदर्शन आयोजित करणे.	ज्ञानवृद्धी व त्यांच्या कार्याची जाणीव होईल
४	फेब्रुवारी, २०२७	परिसंवाद व चर्चासत्र	-महात्मा फुले यांच्या कार्यावर आधारीत परिसंवाद, चर्चासत्र आयोजित करणे.	त्यांच्या कार्याची जाणीव माहिती मिळेल
५	मार्च, २०२७	स्पर्धा	-महात्मा फुले व सावित्रीबाई यांच्यावर निबंध स्पर्धा आयोजित करणे.	ज्ञान, कौशल्य व स्व अभिव्यक्ती
६	एप्रिल-२०२७	समारोप	-समारोप कार्यक्रम, अहवाल सादरीकरण	चिंतन, एकत्रीकरण

महात्मा जोतीराव फुले यांच्या द्विजन्मशताब्दी वर्षानिमित्ताने निश्चित करण्यात आलेले उपक्रम, कार्यक्रमांची यशस्वीपणे अंमलबजावणी होईल यासाठी संचालक (उच्च शिक्षण), संचालक (तंत्र शिक्षण), संचालक (कला) व संचालक (ग्रंथालय) यांनी आपल्या अधिनस्त राज्यातील सर्व विद्यापीठे / महाविद्यालये/ संस्था यांसाठी आवश्यक ते आदेश/ सूचना/परिपत्रके निर्गमित करावीत व सदर उपक्रमांच्या अंमलबजावणीकरीता नियोजन व सनियंत्रण करावे. तसेच राबविलेल्या उपक्रमांना प्रसार माध्यमे / समाजमाध्यमे यांद्वारे व्यापक प्रसिद्धी द्यावी .

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२६११०४१३३१०४०७०८ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने सक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by DR SHRIKANT LAXMANRAO PULKUNDWAR
Date: 2026.11.04 13:32:16 +05'30'

(डॉ. श्रीकांत पुलकुंडवार)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति.

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.

२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.उप मुख्यमंत्री (नगर विकास), महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा.उप मुख्यमंत्री (रा.उ. शु.), महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई
८. अपर मुख्य सचिव उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. सर्व सार्वजनिक / अभिमत/ समूह / खाजगी विद्यापीठांचे कुलगुरु
१०. महासंचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई (व्यापक प्रसिध्दीसाठी)
११. सर्व सहसचिव/ उपसचिव उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत सर्व संचालनालयांचे संचालक
१३. अवर सचिव /कार्यासन अधिकारी, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. निवड नस्ती (समन्वय).